# लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा.

**भास्कर इमारत, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पुर्व),**

**मुंबई — ४०० ०५१.**

**दूरध्वनी कमांक : ०२२—२६४७२७८७**

**ई—मेल : scc-bandra@bhc.gov.in**

## ई—निविदा सुचना

## ई—निविदा क्र.०१/२०२४

लघुवाद न्यायालय, मुंबई या न्यायालयाच्या वांद्रे शाखेतील भास्कर इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई — ४०००५१ येथील न्यायालयामध्ये नियोजित क्षेत्रफळाची व प्रसाधनगृहांची साफसफाई दोन वर्ष कालावधीकरीता बाह्ययंत्रणेमार्फत कंत्राटी पध्दतीने करण्यासाठी शासनमान्य कंत्राटदारांकडून ई—निविदा मागविण्यात येत आहेत.

विस्तृत निविदा, अटी व शर्ती https://mahatenders.gov.in तसेच https://bombayhighcourt.nic.in व https://sccmumbai.dcourts.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संपूर्ण ई—निविदा प्रक्रिया ऑनलाईन व दोन लखोटा पध्दतीमध्ये असून निविदा स्वीकारण्याचा अंतिम दिनांक ३०/१२/२०२४ रोजी सायंकाळी ०५.०० पर्यंत असेल.

ठिकाण: मुंबई.
दिनांक : १० डिसेंबर, २०२४

**अप्पर प्रबंधक**
**लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा.**

# लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा.

मजला क्र.०३, भास्कर इमारत, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), वांद्रे, मुंबई — ४०००५१.
दूरध्वनी क्रमांक :
०२२—२६४७२७८७/९८९२३२४४४९/९७३०८५१५२३/७०३८१२४७७७
ई—मेल : scc-bandra@bhc.gov.in

## ई—निविदा सूचना क्र. १

अप्पर प्रबंधक, लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा, भास्कर इमारत, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई — ४०० ०५१ यांच्यामार्फत शासनमान्य कंत्राटदारांकडून खालील कामासाठी ई—निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदेची अंदाजित रक्कम (estimated cost) | *बयाना रक्कम (Earnest Money Deposit) | *कोऱ्या निविदा नमुन्याची रक्कम (ना—परतावा) | ई—निविदा ऑनलाइन सादर करण्याची शेवटची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | १ | **लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा, भास्कर इमारत, वांद्रे (पूर्व), वांद्रे, मुंबई—४०००५१** येथील मजला क्र. ०३ ते मजला क्र. ०८ पर्यंत (क्षेत्रफळनिहाय परिसर), मा.न्यायाधीश व अधिकारी यांच्या वापराचे प्रसाधनगृहे, पुरुष व महिलांच्या वापराचे सार्वजनिक प्रसाधनगृहे, तळमजला व मजला क्र. ०६ वरील अपंगाचे प्रसाधनगृहे, मुख्य जीना व आपत्कालीन जीना, मोकळ्या परिसरामधील खिडक्या, व्हरांडे, तळमजला परिसरातील प्रवेशद्वाराजवळील सुरक्षा चौक्या, फायर/पंप रुम इत्यादींची साफसफाई/झाडलोट करणे इ. | रुपये ३१,५०,५३८/— (दोन वर्षासाठी) | रुपये ९०,०००/— | रुपये ५,४००/— | दिनांक ३०/१२/२०२४ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत |

लघुवाद न्यायालय, मुंबई या न्यायालयाच्या वांद्रे शाखेमधील भास्कर इमारत, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई— ४०० ०५१ येथील न्यायालयामध्ये नियोजित क्षेत्रफळ व प्रसाधनगृहांची साफसफाई **साहित्यसामुग्रीसह ०२ वर्ष कालावधीकरीता** शासनमान्य कंत्राटदारांकडून बाह्ययंत्रणेमार्फत कंत्राटी पध्दतीने उपलब्ध करण्यासाठी ई—निविदा मागविण्यात येत असून सदर निविदेचा नमुना, सविस्तर तपशील, अटी व शर्ती https://bombayhighcourt.nic.in तसेच https://mahatenders.gov.in व https://sccmumbai.dcourts.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, लघुवाद न्यायालय, धोबी तलाव, मुंबई— ४०० ००२ व लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा, भास्कर इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई— ४०० ०५१ यांच्या सूचना फलकावर तसेच मुंबईतील इतर न्यायालयांच्या सूचना फलकावर पहावयास मिळतील.

तरी इच्छुक शासनमान्य कंत्राटदारांनी सदर निविदेमधील अटी व शर्तींना बांधील राहून विहीत नमुन्यात ई—निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सादर करावयाची आहे.

१. संपूर्ण निविदा प्रक्रिया ऑनलाईन (ई—निविदा) असून ती, तांत्रिक निविदा लखोटा (Technical Bid envelope (B-1)) व आर्थिक निविदा लखोटा (Financial Bid envelope (B-2)) अशा दोन लखोटा पध्दतीत राहील.
२. निविदा भरण्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन दिनांक १० डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी ११.३० पासून ते दिनांक ३० डिसेंबर, २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत डाऊनलोड करता येतील.
३. ई—निविदेसोबत संबंधित कागदपत्रांच्या प्रती सादर (अपलोड) करणे आवश्यक आहे. तसेच निविदा शुल्क (Tender Fee) आणि बयाना रक्कम (Earnest Money Deposit) ऑनलाईन पध्दतीने दिनांक ११ डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी ११.३० ते दिनांक ३० डिसेंबर, २०२४ रोजी सायंकाळी ५.०० पर्यंत जमा करणे बंधनकारक राहील.

*४. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस—२०१४/ प्र. क्र.८२/भाग—III/उद्योग—४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ नुसार **शासकीय मंडळ/ महामंडळ/ उपक्रमांना आणि सुक्ष्म, लघु व मध्यम** उपक्रमांतर्गत नोंदणीकृत असलेले उत्पादक व पुरवठादार यांना निविदेमध्ये **निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासून सूट देण्यात आली आहे.**

५. निविदापूर्व बैठकीची तारीख: दिनांक १३ डिसेंबर, २०२४ रोजी दुपारी २.१५ वाजता घेण्यात येईल.

६. आवश्यक असलेली कागदपत्रे तसेच निविदा शुल्क (Tender Fee) आणि बयाना रक्कम (Earnest Money Deposit) न भरल्यास सदर निविदा अपात्र ठरविण्यात येतील. (अट क्र. ४ च्या अधिन राहून.)

७. तांत्रिक निविदा दिनांक ०२ जानेवारी, २०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता, मजला क्र. ५, संगणक कक्ष, लघुवाद न्यायालय, मुंबईचे वांद्रे शाखा, भास्कर इमारत, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई— ४०० ०५१ येथे ऑनलाईन उघडण्यात येतील.

८. तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या संबंधित निविदाधारकांनी निविदा भरतेवेळी ऑनलाईन सादर केलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रती पडताळणीसाठी दिनांक ०४/०१/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता मजला क्रमांक ०३, लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा, भास्कर इमारत, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई— ४०० ०५१ येथे हजर/सादर करणे आवश्यक आहे.

९. ऑनलाईन आर्थिक निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ: दिनांक ०६ जानेवारी, २०२५ रोजी दुपारी २.३० वाजता.

१०. ठेकेदारांकडे प्रमाणित प्राधिकाराने जारी केलेले डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र (Digital Signature Certificate) असणे आवश्यक आहे.

११. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार निविदा निवड समितीकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

१२. कामाचे ठिकाण व स्वरुपाची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी अप्पर प्रबंधक, लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा, मजला क्रमांक ०३, भास्कर इमारत, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई— ४०० ०५१ यांच्याशी संपर्क साधावा.

१३. सदर निवेदेबाबतीत अधिक माहिती व शंका याकरीता खालील अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संपर्क साधावा.

अप्पर प्रबंधक — श्रीमती आर. के. कुळकर्णी ०२२—२६४७३५८८
९८९२३२४४४९

न्यायालय व्यवस्थापक — श्री.संदीप राणे ९३२०९०७६७६

सिस्टम ऑफीसर — श्री.कमलेश गायकवाड ९६६४२४१४२४
(तांत्रीक कारणांसाठी).

लघुकामे लिपीक — श्री.शैलेश सरवदे ९७३०८५१५२३
श्री. जगन्नाथ देवकते ७०३८१२४७७७

यांच्याशी दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

(आर. के. कुळकर्णी)
अप्पर प्रबंधक,
लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा.

# बाह्ययंत्रणेमार्फत कंत्राटी पध्दतीने साफसफाईच्या कामासाठी

# ई—निविदेचे वेळापत्रक

| अ.क्र. | तपशील | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | संकेतस्थळावर निविदा प्रसिध्दी | १०/१२/२०२४ | सकाळी ११.०० वाजता |
| २ | संकेतस्थळावर निविदा—कागदपत्र प्राप्त करणे (Download) | १०/१२/२०२४ | सकाळी ११.३० पासून |
| ३ | संकेतस्थळावर निविदा—कागदपत्र सादर करणे (Upload) | ११/१२/२०२४ | सकाळी ११.३० पासून |
| ४ | निविदा पूर्व बैठक (Pre-bid meeting) | १३/१२/२०२४ | दुपारी ०२.१५ वाजता |
| ५ | संकेतस्थळावर निविदा—कागदपत्र सादर करण्याचा अंतिम दिनांक | ३०/१२/२०२४ | संध्या. ०५.०० पर्यंत |
| ६ | तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक | ०२/०१/२०२५ | संध्या. ०५.०० वाजता |
| ७ | ऑनलाईन सादर केलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रतींची प्रत्यक्ष पडताळणी. | ०४/०१/२०२५ | सकाळी ११.३० वाजता |
| ८ | आर्थिक निविदा उघडण्याचा दिनांक | ०६/०१/२०२५ | दुपारी ०२.३० वाजता |

## विस्तृत निविदा सूचना तसेच अटी व शर्ती खालीलप्रमाणे

| **अप्पर प्रबंधक, लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा, भास्कर इमारत, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), वांद्रे, मुंबई — ४०० ०५१ यांच्यातर्फे खालील कामांसाठी शासनमान्य कंत्राटदारांकडून ई—निविदा मागविण्यात येत आहेत.** | |
|---|---|
| कामाचे नाव: | लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा, भास्कर इमारत, वांद्रे (पूर्व), वांद्रे, मुंबई— ४०००५१ येथील मजला क्र. ०३ ते मजला क्र. ०८ पर्यंत (क्षेत्रफळनिहाय परिसर), मा.न्यायाधीश व अधिकारी यांच्या वापराचे प्रसाधनगृहे, पुरुष व महिलांच्या वापराचे सार्वजनिक प्रसाधनगृहे, तळमजला व मजला क्र. ०६ वरील अपंगाचे प्रसाधनगृहे, मुख्य जीना व आपत्कालीन जीना, मोकळ्या परिसरामधील खिडक्या, व्हरांडे, तळमजला परिसरातील प्रवेशद्वाराजवळील सुरक्षा चौक्या, फायर/पंप रुम इत्यादींची साफसफाई/ झाडलोट करणे इ. (साहित्यसामुग्रीसह) |
| निविदा अर्जाची किंमत | रुपये ५,४००/— (रूपये पाच हजार चारशे फक्त) |
| निविदेची अंदाजित रक्कम (estimated cost) | रुपये ३१,५०,५३८/— (दोन वर्षासाठी)<br>(रूपये एकतीस लाख पन्नास हजार पाचशे अडतीस फक्त) |
| बयाणा रक्कम (Earnest Money Deposit) | रुपये ९०,०००/— (रूपये नव्वद हजार फक्त) |
| ई—निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ३०/१२/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत. |
| निविदापूर्व बैठकीची तारीख व वेळ | दिनांक १३/१२/२०२४ रोजी दुपारी ०२.१५ वाजता.<br>ठिकाण : मजला क्र. ८, बेलीफ विभाग, लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा, भास्कर इमारत, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई— ४०० ०५१. |
| निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | **ऑनलाईन तांत्रिक निविदा** दिनांक ०२/०१/२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता तसेच **आर्थिक निविदा** दिनांक ०६/०१/२०२५ रोजी दुपारी २.३० वाजता संगणक कक्ष, मजला क्र.५, लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा, भास्कर इमारत, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे पूर्व, मुंबई — ४०० ०५१ येथे |

| | |
|---|---|
| | उघडण्यात येतील. |
| कामाचा कालावधी | कामाची सुरुवात केल्यापासून दोन वर्षे |
| | **निविदा अर्जाची किंमत** रुपये ५,४००/— तसेच **बयाणा रक्कम** रुपये ९०,०००/— चा भरणा ऑनलाईन करण्यात यावा. |
| | निविदा सूचना, अटी व शर्ती या कराराचाच एक भाग असेल. |

**<u>दररोज साफसफाई करावयाचे नियोजित क्षेत्रफळ व प्रसाधनगृहे</u>**

| अ.क्र. | तपशील | क्षेत्रफळ/प्रमाण |
|---|---|---|
| १. | मा.न्यायाधीश व अधिकारी यांची प्रसाधनगृहे | एकूण संख्या — ९ |
| २. | सार्वजनिक पुरुष प्रसाधनगृहे (मजला क्र. ३ ते ८) | एकूण संख्या — ६ |
| ३. | सार्वजनिक महिला प्रसाधनगृहे (मजला क्र. ३ ते ८) | एकूण संख्या — ६ |
| ४. | अपंगाचे प्रसाधनगृहे (मजला क्र. ६ व तळमजला परिसर) | एकूण संख्या — ३ |
| ५. | तिसरा ते आठवा मजला येथील कॉमन पॅसेज | ७०५.११ स्क्वेअर मीटर |
| ६. | तिसरा ते आठवा मजला येथील मोकळ्या परिसरामधील खिडक्या | ७८.५० स्क्वेअर मीटर |
| ७. | तिसरा मजला ते आठवा मजला येथील मुख्य जिना तसेच आपत्कालीन काळासाठीचा जिना | १९८.५० स्क्वेअर मीटर |
| ८. | प्रवेशद्वाराजवळील सुरक्षा चौक्या व फायर/पंप रुम | एकुण संख्या —३ |

**<u>बयाणा रक्कम (Earnest Money Deposit):—</u>** खालील नमूद केलेल्या बाबींची पूर्तता निविदाकाराकडून न झाल्यास सदर निविदाकाराची बयाणा रक्कम जप्त करण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील:

अ) निविदा स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर निविदा किंवा प्रस्ताव मागे घेणे किंवा त्यात फेरफार करणे.

ब) करारावर सही न करणे.

क) निविदा किंवा प्रस्ताव स्वीकारण्यात आल्यानंतर करारानुसार कामगिरीसाठी आवश्यक सुरक्षा अनामत न भरणे.

ड) निविदा दस्तावेजामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे करारावर सही करण्यापूर्वी कोणत्याही अन्य अटींची पूर्तता न करणे.

**अनामत रक्कम:—** यशस्वी निविदाकाराला निविदा रकमेच्या ३ टक्के इतकी अनामत रक्कम खालीलपैकी कोणत्याही एक प्रकारे ठेवावी लागेल.

अ) मुंबई शहरामध्ये देय असलेल्या व प्रबंधक, लघुवाद न्यायालय, मुंबई यांच्या नावाने काढलेल्या डिमांड ड्राफ्टद्वारे.

ब) कोणत्याही अनुसूचित वाणिज्यिक बॅक/राष्ट्रीयीकृत बॅकेतील दोन वर्षाच्या कालावधीसाठी वैध राहणाऱ्या बॅकेच्या हमीद्वारे.

**निविदा प्रक्रिया:—** संपूर्ण निविदा प्रक्रिया ऑनलाईन (ई—निविदा) असून ती, तांत्रिक निविदा लखोटा (Technical Bid envelope (B-1)) व आर्थिक निविदा लखोटा (Financial Bid envelope (B-2)) अशा दोन लखोटा पध्दतीत राहील.

**१) तांत्रिक निविदा :** यामध्ये खालील बाबींचा समावेश असेल.

| | |
|---|---|
| १. | निविदाकाराने सफाई कामगार यांची सेवा केंद्र शासन/राज्य शासन वा इतर अन्य आस्थापनांमध्ये पुरविली असल्यास याबाबतचे संबंधित कार्यालयाचे जारी केलेले कार्यादेश आणि कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र सादर करावे. |
| २. | कंपनीचे/संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र. |
| ३. | प्रोफेशनल टॅक्स प्रमाणपत्र. |
| ४. | ई.पी.एफ (Employees Provident Fund) नोंदणी प्रमाणपत्र. |
| ५. | ई.एस.आय.एस. (Employees State Insurance Scheme) नोंदणी प्रमाणपत्र. |
| ६. | आयकर विभागाने जारी केलेले पॅन कार्ड (PAN CARD). |
| ७. | चालू स्थितीतील G.S.T. नोंदणी प्रमाणपत्र. |
| ८. | मागील तीन वर्षाचे आयकर प्रमाणपत्र. |
| ९. | निविदा अर्जाचे शुल्क व बयाना रकमेचा भरणा शासकीय नियमाप्रमाणे केला असणे आवश्यक. |
| १०. | सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांतर्गत नोंदणीकृत असलेले उत्पादक व पुरवठादार यांचे नोंदणी प्रमाणपत्र. |
| ११. | निविदा अटी व शर्तीच्या कागदपत्रावर निविदाकाराची सही, शिक्का असणे आवश्यक आहे. |
| १२. | परिशिष्ट **“ब”** व **“क”** . |

**वर नमूद केलेली सर्व कागदपत्रे वर दिलेल्या क्रमानेच सादर करण्यात यावी.** तसेच उपरोक्त नमूद केलेल्या **कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती सादर करण्यात याव्यात.** कंत्राटदाराने निविदा अर्जासोबत सदर प्रमाणपत्रे सादर न केल्यास, निविदा अर्ज तांत्रिक निविदा प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

सर्वप्रथम तांत्रिक निविदा उघडण्यात येईल. तांत्रिक निविदा उघडताना निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी हजर राहणे आवश्यक आहे व **त्यावेळेस त्यांनी प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती पडताळणीसाठी हजर ठेवणे आवश्यक आहे.** जर निविदाकार तांत्रिक निविदेमध्ये नमूद केलेल्या बाबींची पूर्तता करीत नसेल तर त्याची निविदा अपात्र ठरविण्यात येईल व सदर निविदाकाराची आर्थिक निविदा पुढील कार्यवाहीसाठी ग्राहय धरण्यात येणार नाही. पात्र ठरणा—या निविदाकारांचीच आर्थिक निविदा उघडण्यात येईल. निविदेमध्ये नमूद केलेली निविदा स्वीकारण्याची व उघडण्याची तारीख महाराष्ट्र शासनातर्फे सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आल्यास निविदा स्वीकारण्याची व उघडण्याची तारीख पुढील कार्यालयीन दिवस व नियोजित वेळेस राहील. **आर्थिक निविदेमधील रक्कम तांत्रिक निविदेमध्ये नमूद करण्यात येऊ नये.** जर तसे आढळल्यास संबंधित निविदाकाराची निविदा बाद ठरविण्यात येईल.

**२) आर्थिक निविदा : यामध्ये कंत्राटदार निविदा अर्ज योग्यरित्या भरुन त्याचे नाव, सही व शिक्क्यासहीत सदर कामासाठी सादर करीत असलेल्या सर्व रकमेचा अंतर्भाव करावा.**

आर्थिक निविदेमध्ये निविदाकाराने नमूद केलेले दर निविदेमधील सर्व अटी व शर्तीची पूर्तता करीत असेल, तर पुढील कार्यवाहीसाठी निविदा ग्राहय धरण्यात येईल.

निविदा स्वीकारण्याचा अधिकार या कामासाठी नियुक्त केलेल्या निवड समितीला असतील व कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार सदर समितीला असेल.

**सर्वसाधारण अटी व शर्ती:—**

१. प्राप्त झालेल्या निविदांमधून सर्व अटी व शर्तींचे/ शासनाने वेळोवेळी प्रसृत केलेले शासन निर्णय/ज्ञापन/परिपत्रके यांचे पालन करुन पात्र ठरलेल्या निविदांमधील न्यूनतम किंमतीची निविदा स्वीकृत करण्यात येईल.

२. ज्या निविदेमध्ये कंत्राटदाराने त्याच्या कामगारांना अदा करावयाची वेतनाची रक्कम, ही किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार कंत्राटदाराकडून कंत्राटी कामगाराला देय असलेले **किमान वेतन + विशेष भत्ता + बोनस + भविष्य निर्वाह निधी + राज्य कामगार विमा योजनेत जमा करावयाची रक्कम + उपदान इत्यादी** मिळून होणारी रक्कम व कामगार कायद्यातील इतर तरतुदींनुसार देय रक्कम यापेक्षा कमी नमूद केली असल्यास, अशा कंत्राटदाराची निविदा स्वीकृत करण्यात येणार नाही.

३. कंत्राटदाराने निविदेमध्ये एकूण दर नमूद करतेवेळी G.S.T. चा अंतर्भाव करावा परंतू सदर G.S.T. ही त्यांनी मागणी केलेल्या रकमेवर आकारण्यात यावी व साधनसामुग्रीच्या खर्चावर G.S.T. आकारण्यात येऊ नये.

४. कंत्राटदाराने निविदा प्रक्रियेसाठी निविदा अर्ज सादर करताना, त्यांच्या कंपनीचे/संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र/G.S.T. चे प्रमाणपत्र/मागील तीन वर्षाचे आयकर प्रमाणपत्र/पॅनकार्ड/ई.एस.आय.सी. प्रमाणपत्र/ पी.एफ प्रमाणपत्र/प्रोफेशनल टॅक्स प्रमाणपत्र त्याचप्रमाणे सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांतर्गत नोंदणीकृत असलेले उत्पादक व पुरवठादार असतील तर त्यांचे नोंदणी प्रमाणपत्र. या सर्व प्रमाणपत्रांची छायांकीत प्रत निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराने निविदा अर्जासोबत सदर प्रमाणपत्रे सादर न केल्यास, निविदा अर्ज निविदा प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

५. कंत्राटदाराने शासकीय नियमाप्रमाणे अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे. (दिनांक १ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयाला अधिन राहून)

६. कंत्राटदाराने न्यायालयाचे कामकाजासाठी नेमलेल्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायद्यातील तरतुदींपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निदर्शनास आले तर संबंधित कंत्राटदारावर किमान वेतन कायद्यातील तरतुंदीप्रमाणे कारवाई करण्यात येईल व त्याचे कंत्राट तात्काळ रद्द करुन त्याचे नाव

काळया यादीत टाकण्याची कारवाई करण्यात येईल.

७. कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना कामाचे वेतन व त्या अनुषंगाने इतर सर्व भत्ते रोख स्वरुपात अदा न करता, संबंधित कंत्राटी कामागाराच्या नावाने Account Payee Cross cheque द्वारे (रेखांकीत धनादेशाद्वारे) अदा करणे आवश्यक राहील.

८. कंत्राटदाराने कंत्राटी कामगाराला दिलेल्या वेतनाच्या/इतर भत्त्यांच्या धनादेशाची (चेकची) छायांकीत प्रत किंवा ई.सी.एस.द्वारे/एन.ई.एफ.टी.द्वारे वेतनाची रक्कम/इतर भत्त्यांची रक्कम कंत्राटी कर्मचा—याच्या बॅक खात्यात जमा केल्याचे दर्शविणारे बॅक अधिका—यांच्या सहीचे विवरणपत्र (statement) आणि कंत्राटी कामगारांची स्वाक्षरी असलेले वेतन देयक (ज्यावर संबंधित कंत्राटी कामगाराचा धनादेश क्रमांक/ई.सी.एस.क्रमांक/एन. ई.एफ.टी. क्रमांक लिहिलेला असेल) कंत्राटदाराने दरमहा या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

जोपर्यंत कंत्राटदार वरील कागदपत्रे सादर करणार नाही तोपर्यंत त्या महिन्याचे कंत्राटदाराचे देयक अदा करण्यात येणार नाही.

९. किमान वेतन कायद्यातील तरतुदींनुसार, कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांस भरपगारी साप्ताहीक सुट्टी देणे बंधनकारक राहील. त्यामुळे कंत्राटदाराने साप्ताहीक सुट्टीच्या दिवशी कंत्राटी सेवा उपलब्ध करुन दिल्यास त्याच्या कंत्राटी कर्मचा—यास बदली रजा अथवा किमान वेतन अधिनियम व कामगार कायद्यानुसार देय असलेले त्या दिवसाचे वेतन यापैकी कोणताही एक पर्याय निवडता येईल. कंत्राटी कामगाराने बदली रजेचा पर्याय निवडल्यास कार्यालयीन कामकाजाचा खोळंबा होऊ नये म्हणून बदली रजेच्या दिवशी दुसरा कामगार उपलब्ध करुन देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

१०. कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी कामगाराकडून आठ तासापेक्षा जास्त वेळ कंत्राटी सेवा उपलब्ध करुन घेतल्यास किमान वेतन अधिनियम व कामगार कायद्यातील तरतुदींनुसार योग्य तो अतिकालीक भत्ता या कार्यालयाकडून कंत्राटदारास अदा करण्यात येईल. सदर भत्त्याचे स्वतंत्र देयक कंत्राटदाराने

प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपूर्वी या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. सदर देयक अधिदान व लेखा कार्यालयाने मंजूर केल्यावरच देयकाचे प्रदान करण्यात येईल.

११. कंत्राटदारास त्याने नेमलेल्या कंत्राटी सफाई कामगार यांना किमान वेतन अधिनियम, १९४८ मधील तरतुदीनुसार वेतन, महागाई भत्ता, इतर भत्ते व सवलती देणे बंधनकारक राहील.

१२. दुसरा व चौथा शनिवार त्याचप्रमाणे रविवार तसेच सार्वजनिक सुटटीच्या दिवशी कार्यालय कार्यरत असल्यास कामगारांना साफसफाई करण्यासाठी कार्यालयात बोलवण्यात आल्यास, सदर सेवा पुरविणे कंत्राटदारास बंधनकारक असेल व त्यासाठी अतिरीक्त आकार दिला जाणार नाही.

१३. निविदा अटी व शर्तींचे पालन झाले नसल्यास/ होत नसल्यास, करण्यात आलेले निविदा करार/ कंत्राट तात्काळ रद्द करण्यात येईल.

१४. कंत्राटाचा कालावधी दोन वर्षांचा असेल.

१५. ज्या कंपनीस/ संस्थेस काम सोपविण्यात येईल त्यांनी त्याबाबतच्या अटी व शर्तीनुसार करार करणे आवश्यक राहील.

१६. कंपनी/ संस्थेतर्फे काम करण्या—या कर्मचा—यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा या कार्यालयावर राहणार नाही.

१७. सदरील निविदेस शासनाकडून प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर कंत्राटदारासोबत सेवाकरार करण्यात येईल व त्यामधील अटी व शर्तीस अधीन राहून कंत्राटदारास साफसफाईची सेवा पुरविणे बंधनकारक राहील.

१८. कंत्राटदारामार्फत दिल्या जाणा—या वरील सेवा/ सुविधा इत्यादीबाबतच्या कार्यपध्दतीचा व कामाचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल व वेळोवेळी सुचविलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१९. न्यायालयास कंत्राटी पध्दतीने पुरविण्यात येणा—या सोईसुविधा/ काम यांचेसाठी जी कंत्राटी सेवा कंत्राटदारामार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहे, त्या अनुषंगाने लागू असणारे सर्व शासकिय व निमशासकिय कर कंत्राटदाराने अदा करावेत.

२०. उपरोक्त कामासाठी कंत्राटदारामार्फत ज्यांना काम देण्यात येणार आहे, त्यांना

नियमित कर्मचा—यांप्रमाणे नियम, अटी व शर्ती लागू राहणार नाहीत. तसेच त्यांना नियमित कर्मचा—यांप्रमाणे कोणतेही वेतन व भत्ते तथा अनुषंगिक लाभ अनुज्ञेय/ लागू राहणार नाहीत. कंत्राटी कामगारांची सेवा कालावधी किंवा कर्तव्य कालावधी तसेच त्यांच्या मानधनाबाबत हे कार्यालय कसल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

२१. कंत्राटदारास शासन निर्णय क्रमांक पदनि २५१२/प्र.क्र.१५७/का.१२, दिनांक २७ जानेवारी, २०१५ मध्ये दिलेल्या निर्देशांचे त्याचप्रमाणे दिनांक २७ जानेवारी, २०१५ याआधी जारी केलेले व नंतर जारी करण्यात येणारे शासन निर्णय, शासन ज्ञापन, परिपत्रके यामधील निर्देशांचे पालन करणे बंधनकारक आहे.

२२. स्वीकृत पात्र निविदा मा. उच्च न्यायालयामार्फत शासनाकडे प्रशासकीय मंजुरीसाठी पाठविण्यात येईल. मा. उच्च न्यायालय व शासनाकडून आवश्यक ती मंजूरी मिळाल्यानंतरच यशस्वी निविदाकारास निविदा स्वीकृती आदेश देण्यात येईल.

२३. साफसफाईच्या कामासाठी लागणारे सर्व साहित्य, अवजारे, फिनाईल इत्यादी पुरविण्याची जबबादारी कंत्राटदाराची राहील. साहित्यसामुग्रीचा दैनंदीन साठा मुबलक प्रमाणात करुन ठेवणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे कंत्राटी सफाई कामगार हे गणवेश परिधान करुन कामावर हजर राहतील. सफाई कामगारांना गणवेश पुरविण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२४. साफसफाई कामासाठी दर महिन्यासाठी कोणकोणते साहित्य, अवजारे, फिनाईल, ॲसिड वा इतर तत्सम बाबी पुरविल्या जाणार आहेत त्यांची नावे व संख्या **परिशिष्ट 'ब'** मध्ये नमूद करण्यात यावी. त्याचप्रमाणे क्षेत्रफळनिहाय साफसफाई करण्यासाठी कंत्राटदारामार्फत किती सफाई कामगार पुरविले जाणार आहेत, त्यांची संख्या **परिशिष्ट 'क'** मध्ये दिलेल्या कोष्टकामध्ये नमूद करण्यात यावी.

परिशिष्ट **'ब'** व **'क'** तांत्रिक निविदेबरोबर सादर करण्यात यावीत.

२५. साफसफाईसाठी पुरविले जाणारे फिनाईल, ॲसिड वा इतर तत्सम रसायने

**Eco Friendly** असणे आवश्यक आहे. सदर पुरविले जाणारी रसायनांचे कंपनीचे नाव, ब्रँड **परिशिष्ट 'ब'** मध्ये नमूद करणे आवश्यक आहे.

२६. कंत्राटदाराने परिशिष्ट **'क'** मध्ये सादर केलेल्या कामगारांची संख्या करारनामा संपेपर्यंत काटेकोर पणे पाळण्यात यावी.

२७. कंत्राटदाराने पुरविलेले कामगार वारंवार बदलू नये व बदलण्याची आवश्यकता भासल्यास त्याची पूर्व सूचना व नविन बदली कामगाराची संपूर्ण माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करावी.

२८. कंत्राटदाराने निविदेमध्ये नमूद केलेले दर २ वर्षासाठी वैध राहतील. त्याच्यामध्ये कोणत्याही परिस्थित वाढ होणार नाही.

२९. कंत्राटदाराने पुरविलेल्या कामगारांची चारित्र पडताळणी करणे कंत्राटदारास बंधणकारक राहील.

३०. कार्यालयात कामगारांना कंपनी/संस्थेचे ओळखपत्र परिधान करणे अनिवार्य राहील.

३१. कंत्राटदारामार्फत नेमूण दिलेल्या सफाई कामगारांनी जमा केलेल्या कच—याची विल्हेवाट वेळोवेळी करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

(आर. के. कुळकर्णी)
अप्पर प्रबंधक
लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा

# SCOPE OF WORK FOR MANUAL CLEANING

( Passages, Main Staircase, Emergency Staircase, Passage towards Main Staircase, Passage towards Emergency Staircase, Security cabins, Lift Lobby, Judges Toilets and Public Toilets **from 3rd Floor to 8th Floor, Bhaskar Building, Court of Small Causes, Bandra Branch)**

| Sr. | Area | Scope of Work | Frequency |
|---|---|---|---|
| 1 | Floor Cleaning/ Toilets (Public Toilets) | Manually | Daily in Every 4 Hours and more if required |
| 2 | Floor Cleaning (Passages) | Sweeping | Daily 2 times |
| 3 | Floor Cleaning/ Toilets (Judges/ Officers Toilets) | Manually | Daily 2 times |
| 4 | Staircase (Main & Emergency) | Wet/Dry wiping | Daily 2 times |
| 5 | Passage towards Main & Emergency Staircase | Wet/Dry wiping | Daily 2 times |
| 6 | Lift Lobby | Wet/Dry wiping | Daily 2 times |
| 7 | Water Cooler Platform | Wet/Dry Wiping | Daily 2 times |
| 8 | Two Security Cabins, Fire and Pump Room | Wet/Dry Wiping | Daily 2 times |
| 9 | Paper Collection and Garbage Disposal | Collection of wastage papers, bags,rubbish spread | Daily 2 times |
| 10 | Water Cooler (outside) | Dry wiping | Weekly |
| 11 | Fire Equipments | Dusting/Wiping | Weekly |
| 12 | Cleaning of Sanitary fittings, toilet drain pipes, wash basin drain pipes | Manually with necessary equipments | Weekly, as and when required |
| 13 | Window Glass and Frame Cleaning | Wet/Dry Wiping | Fortnight |
| 14 | Ceiling | Dusting | Fortnight |
| 15 | Visible Cables | Dusting | Fortnight |
| 16 | Pillars, Side wall and partition cleaning | Dry Wiping and dusting | Fortnight |
| 17 | Tube lights, Electric bulbs, Fans, | Dusting | Monthly |

| | | | |
|---|---|---|---|
| | Electrical Panals | | |
| 18 | Clearing of any choking's in the drainages | Manually with necessary equipments | As and when required |
| 19 | Any other cleaning work as and when assigned by the office. | | |

(R. K. Kulkarni)
Additional Registrar,
Small Causes Court, Bandra Branch.

# परिशिष्ट — अ

## दररोज साफसफाई करावयाचे नियोजित क्षेत्रफळ व प्रसाधनगृहे

| अ.क्र. | तपशील | क्षेत्रफळ/प्रमाण |
|---|---|---|
| १. | मा.न्यायाधीश व अधिकारी यांची प्रसाधनगृहे | एकूण संख्या — ९ |
| २. | सार्वजनिक पुरुष प्रसाधनगृहे (मजला क्र. ३ ते ८) | एकूण संख्या — ६ |
| ३. | सार्वजनिक महिला प्रसाधनगृहे (मजला क्र. ३ ते ८) | एकूण संख्या — ६ |
| ४. | अपंगाचे प्रसाधनगृहे (मजला क्र. ६ व तळमजला परिसर) | एकूण संख्या — ३ |
| ५. | तिसरा ते आठवा मजला येथील कॉमन पॅसेज | ७०५.११ स्क्वेअर मीटर |
| ६. | तिसरा ते आठवा मजला येथील मोकळ्या परिसरामधील खिडक्या | ७८.५० स्क्वेअर मीटर |
| ७. | तिसरा मजला ते आठवा मजला येथील मुख्य जिना तसेच आपत्कालीन काळासाठीचा जिना | १९८.५० स्क्वेअर मीटर |
| ८. | प्रवेशद्वाराजवळील सुरक्षा चौक्या व फायर/पंप रुम | एकुण संख्या —३ |

# परिशिष्ट — ब

## साफसफाई कामासाठी वापरण्यात येणारे साहित्य व त्यांची संख्या (एक महिन्यासाठी)

| Sr.No | Material | Name of Company/ Brand (if applicable) | Required Quantity (per Month) |
|---|---|---|---|
| 1. | Caustic Soda | | |
| 2. | Wiper | | |
| 3. | Spray Pump | | |
| 4. | Bucket (Small) | | |
| 5. | Wire Brush | | |
| 6. | Hard Broom | | |
| 7. | Soft Broom | | |
| 8. | Hockey Brush | | |
| 9. | Mugs | | |
| 10. | Dustbin bucket | | |
| 11. | Wheel Garbage Dustbin 120 Litre Green Plastic Dustbin ( Blue, Green, Red ) | | |
| 12. | Cotton Cloth | | |
| 13. | Duster | | |
| 14. | Glass Cleaner | | |
| 15. | Rubber Hand Gloves | | |
| 16. | Dust Collector | | |
| 17. | Scotch Brite | | |
| 18. | Floor Cleaner | | |
| 19. | Chock up Pump | | |
| 20. | Acid | | |
| 21. | Naphthalene Balls | | |
| 22. | Phenyle | | |
| 23. | Any other chemical required for cleaning | | |
| 24. | Garbage bags | | |
| 25. | Air freshener | | |
| 26. | Bleaching powder | | |

(कंत्राटदाराची सही व शिक्का)

# <u>परिशिष्ट — क</u>

**क्षेत्रफळनिहाय साफसफाई करण्यासाठी**
**कंत्राटदारामार्फत पुरविण्यात येणारे सफाई कामगार**

| | |
|---|---|
| क्षेत्रफळनिहाय साफसफाई करण्यासाठी कंत्राटदारामार्फत पुरविण्यात येणा—या सफाई कामगारांची संख्या समोरील रकान्यामध्ये नमूद करावी. | |

**(कंत्राटदाराची सही व शिक्का)**

# <u>निविदा पूर्णत्वासाठीचा बँक हमी नमुना</u>

Name of the Department :..............................................................................

Address of the Department :..............................................................................

..............................................................................................................

Dear Sir,

Whereas you intent to enter into a contract, as per your Letter of Intent, Reference No.------------------------- dated---------------------------(Hereinafter referred to as "the contract") with M/s.-------------------------------as Service Provider for providing services of ...........defined in contracts schedule,(hereinafter referred to as "the services") and whereas the service provider has undertaken to produce a performance bond for amount of Rs. ---------------------------being equal to ------% of the total contract value of the services to be delivered as specified contract No.--------------------------- dated-----------referred to as "contract to secure its obligations to the beneficiary with respect to the services specified in the contract.

1. We---------------(Name of the Bank), hereby expressly, irrevocably and unreservedly undertake and guarantee as principal obligators on behalf of the Service Provider that in the event that the beneficiary submits a written demand to us stating that the Service Provider has not performed according to the terms and conditions of the contract, we will pay you on demand and without demur any sum up to a maximum amount of (3% of the contract value). Any claims must bear the confirmation of your bankers that the signatures thereon are authentic. Your written demand shall be conclusive evidence to us that such written demand. For the avoidance of doubt any documents received by way of facsimile or similar electronic means is/are not acceptable for any purpose(s) under this guarantee.

2. We shall not be discharged or released from this undertaking and guarantee by any arrangements, variations made between beneficiary and the Service Provider or any forbearance whether as to payment, time performance or otherwise.

3. In no case shall the amount of the guarantee be increased.

4. Unless a demand under this guarantee is received by us in writing on or before the expiry date(unless this guarantee is extended by the Service provider), all your rights under this guarantee shall be forfeited and we shall be discharged from the liabilities hereunder.

5. This guarantee shall be a continuing guarantee (which means guarantee will also be valid if the bank is in under liquidation or bankruptcy) and shall not be discharged by any change in the constitution of the bank or in the constitution of the Seller.

6. Please return this letter of guarantee immediately after our liability thereafter has ceased to be valid.

7. Our liability under this guarantee will cease to be valid even if the guarantee deed is not returned to us.

8. This guarantee is personal to the beneficiary and not assignable to a third party without our prior written consent.

9. This guarantee shall be governed by Indian Law. This guarantee is valid until the (---mention date---).

**Signature and Seal of Guarantor**

.................................................................

Date.........................................................

Address:.....................................................

.................................................................

.................................................................

# निविदेचा नमुना

| | |
|---|---|
| **निविदा मागविणा—या कार्यालयाचे नाव** | **लघुवाद न्यायालय, मुंबई.**<br>लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव,<br>काळबादेवी, मुंबई — ४०० ००२ |
| **कामाचे स्वरुप** | **लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा, भास्कर इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई— ४०० ०५१**<br>येथील (परिशिष्ट— अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे मजला क्र. ०३ ते मजला क्र. ०८ पर्यंत (क्षेत्रफळनिहाय परिसर), मा.न्यायाधीश व अधिकारी यांच्या वापराचे प्रसाधनगृहे, पुरुष व महिलांच्या वापराचे सार्वजनिक प्रसाधनगृहे, तळमजला व मजला क्र. ०६ वरील अपंगाचे प्रसाधनगृहे, मुख्य जीना व आपत्कालीन जीना, मोकळ्या परिसरामधील खिडक्या, व्हरांडे, तळमजला परिसरातील प्रवेशद्वाराजवळील सुरक्षा चौक्या, फायर/पंप रुम इत्यादींची साफसफाई/ झाडलोट करणे इ. (साहित्यसामुग्रीसह) |

| | | |
|---|---|---|
| निविदा क्रमांक:— | | |
| कंत्राटदाराचे /संस्थेचे/कंपनीचे नाव | | |
| कंत्राटदाराचा/संस्थेचा/कंपनीचा संपूर्ण पत्ता | | |
| कंत्राटदाराचा/संस्थेचा/कंपनीचा संपर्क दूरध्वनी | | |
| कंत्राटदाराचा/संस्थेचा/कंपनीचा नोंदणी क्रमांक | | |
| कंत्राटदाराचा/संस्थेचा/कंपनीचा G.S.T. क्रमांक | | |

| अ.क्र | कामाचे स्वरूप | क्षेत्रफळनिहाय साफसफाई करण्यासाठी कंत्राटदाराने मागणी केलेली एकूण रक्कम **(वार्षिक)** | साधनसामुग्री खर्च (रूपये) **(वार्षिक)** | G.S.T. 18% (साधन सामुग्री खर्चावर G.S.T. आकारण्यात येऊ नये) **(वार्षिक खर्च)** | एकूण रक्कम (रूपये) (स्तंभ ३+४+५) **(वार्षिक)** | एकूण रक्कम (रूपये) **(वार्षिक)** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा, भास्कर इमारत, वांद्रे (पूर्व), वांद्रे, मुंबई—४०००५१ येथील मजला क्र. ०३ ते मजला क्र. ०८ | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पर्यंत (क्षेत्रफळनिहाय परिसर), मा.न्यायाधीश व अधिकारी यांच्या वापराचे प्रसाधनगृहे, पुरुष व महिलांच्या वापराचे सार्वजनिक प्रसाधनगृहे, तळमजला व मजला क्र. ०६ वरील अपंगाचे प्रसाधनगृहे, मुख्य जीना व आपत्कालीन जीना, मोकळ्या परिसरामधील खिडक्या, व्हरांडे, तळमजला परिसरातील प्रवेशद्वाराजवळील सुरक्षा चौक्या, फायर/पंप रुम इत्यादींची साफसफाई/ झाडलोट करणे इ. | | | | | |

निविदेची **दोन वर्षांसाठी** होणारी एकूण रक्कम रूपये ......................................./—
(अक्षरी रूपये ..........................................................................................................)

**(कंत्राटदाराचे नाव, सही, शिक्का, दिनांक)**

**सूचना :** **१. सदर निविदेचा नमूना भरून ०६.०१.२०२५ रोजी दुपारी २.३० वाजता आर्थिक निविदा उघड केल्यानंतर कार्यालयात सादर करावा.**

**२. आर्थिक निविदेमध्ये नमूद केलेली रक्कम व सदर निविदा नमून्यामध्ये नमूद केलेली रक्कम यामध्ये तफावत असू नये.**